महाराष्ट्रातील जनतेचा आक्रोश, दैनिक नांदगांव

# आवाज

संपादक : भगवान सोनवणे

WWW.DAILYAWAZ.COM

RNI Reg. No.: MAHMAR/2014/66104 ■ वर्ष - १२ वे ■ अंक क्र. - १९१ ■ शनिवार दि.१४ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत - १ रूपया ■ पाने - ४

* उत्सुकता *




## विंचूर जि.प. शाळा गट नं. ६२७ प्रकरणात प्रशासनाचा ठोस निर्णय

### शाळेची नोंद कायम ठेवण्याचे आदेशः महसूल नोंदींची सखोल पडताळणी सुरू

**दै. आवाज वृत्तसेवा...**

विंचूर ता. १३ - येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (गट नं. ६२७) संदर्भात उद्भवलेल्या प्रकरणाची प्रशासन-ाने गांभीर्याने दखल घेतली असून संबंधित महसूल व सीटीएस नोंदींची सखोल पडताळणी सुरू करण्यात आली आहे. शाळेच्या जमिनीबाबत कोणतीही बेकायदेशीर अथवा चुकीची नोंद होऊ दिली जाणार नाही. अशी स्पष्ट भूमिका तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी मांडली.



ता.११ फेब्रुवारी रोजी सचिन रत्नाकर दरेकर, सरपंच, ग्रामपंचायत विंचूर यांनी सादर केलेल्या निवेदनानुसार गट नं. ६२७ मधील शाळेची जमीन चुकीच्या जनरल मुखत्यारपत्राच्या आधारे खरेदी करण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. शाळेची जमीन ही गावातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हक्काशी व भविष्याशी निगडीत संवेदनशील विषय असल्याने या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले.

याअनुषंगाने उपअधीक्षक. भूमी अभिलेख यांच्याकडून सीटीएस नोंदींबाबत सविस्तर अहवाल मागविण्यात आला. प्राप्त अहवालानुसार मूळ सर्वे नं. ६८२ हा गटस्कीमनंतर गट नं. १८२६ झाला असून पुढे विंचूर गाव विभाजनानंतर गट नं. ६२७ असा क्रमांक निश्चित करण्यात आला आहे संबंधित गटाचे एकूण क्षेत्र ०.५४ आर आहे. जुना सर्वे नं. ६८२ मधील सिटी सर्वे नं. १२३२, १२३३ व १२३४ या मिळकती सन १९७३ पासून जिल्हा परिषद, नाशिक यांच्या नावे चौकशी नोंदवहीत नमूद आ-हेत. त्यानुसार संबंधित मालमत्ता पत्रके जिल्हा परिषद.

नाशिक व मराठी शाळा. जिल्हा परिषद नाशिक यांच्या नावाने तयार आ-हेत. तथापि. उर्वरित खुल्या जागेची स्वतंत्र मालमत्ता पत्रिका तयार न झाल्यामुळे संपुर्ण गटाचे मिळकत पत्रीका तयार झाल्याशिवाय महसूल विभागाकडील ७/१२ उतारा बंद करण्यात येत नाही या प्रक्रियात्मक त्रुटीचा गैरफायदा घेत गटातील ०.१०.५० आर क्षेत्राची खरेदी झाल्याचे प्राथमिक तपासात निदर्शनास आले आहे.

शासनाच्या प्रचलित नियमांनुसार खुल्या जागेचा स्वतंत्र सीटीएस क्रमांक निश्चित झाल्यानंतर एकूण क्षेत्राचा मेळ घेऊन महसूल विभागाकडील७/१२बंदकरण्याची कायदेशीर कार्यवाही तातडीने करण्यात येणार आहे. दरम्यान, सदर मिळकतीबाबत कोणतीही फेरफार नोंद अथवा हस्तांतरण होऊ नये यासाठी संबंधित तलाठी यांना स्पष्ट निर्देश देण्यात आले असून. चौकशी नोंदींनुसार जिल्हा परिषद शाळेची नोंद कायम ठेवण्यात येणार आहे. शिक्षण संस्थांशी संबंधित जमीनप्रकरणात प्रशासन कोणतीही तडजोड करणार नाही. कायद्यानुसार दोष आढळल्यास संबंधितांवर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. असा ठाम इशाराही तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी दिला आहे.

***

## शहर जिल्हा शिधापत्रिकाधारकांची लूट थांबवा

### रिपब्लिकन पक्ष डेमोक्रॅटिक सोशालिस्ट पक्षाची जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडे मागणी

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक : - शहर व जिह्यात नवीन शिधापत्रिका काढण्यासाठी ऑनलाईन प्रणालीद्वारे सीएससी केंद्रामार्फत करण्यात येणाऱ्या प्रक्रियेत सर्वसामान्य नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असून ही लूट तात्काळ थांबवावी, अशी मागणी रिपब्लिकन पक्षाच्या पक्षाच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे. नवीन शिधापत्रिका तयार करताना पब्लिक लॉगिन प्रणा-लीद्वारे आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्यासाठी सीएससी केंद्राकडून पाचशे ते हजार रुपये आकारले जात आ-हेत. शिधापत्रिकाधारक हा सर्वसामान्य कुटुंबाचा प्रमुख असून मर्यादित उत्पन्नात कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असत-ो. अशा परिस्थितीत वारंवार पैसे खर्च करावे लागणे अन्यायकारक असल्याचे रिपब्लिकन पक्षाने नमूद केले आहे. शिधापत्रिकेसाठी अर्ज केल्यानंतर संबंधित पुरवठा विभागातील लिपिक, पुरवठा अधिकारी व तहसीलदार यांच्याकडून कागदपत्रांची तपासणी केली जाते. मात्र, कागदपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास संबंधित शिधापत्रिकाधारकास कोणतीही पूर्वसूचना न देता प्रकरण टाइम आऊट करून कायमस्वरूपी बाद केले जात आहे त्यामुळे नागरिकांना पुन्हा नव्याने अर्ज करावा लागत आहे व त्यासाठी पुन्हा सीएससी केंद्रात पैसे भरावे लागतात. या प्रक्रियेमुळे शिधापत्रिकाधारकांची उघड आर्थिक लूट होत असून ही पद्धत तत्काळ बदलण्यात यावी. त्रुटी असल्यास त्या संबंधित अर्जदारास कळवून दुरुस्तीची संधी द्यावी व त्यानंतरच अंतिम निर्णय घ्यावा, अशी ठाम मागणी रिपब्लिकन पक्षाने केली आहे. या संदर्भात कारवाई न झाल्यास पक्षातर्फे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदन सादर करताना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष कैलास भाई पगारे, उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख शांतारामभाऊ दुनबळे, तसेच जिल्हाध्यक्ष अरुण गांगुर्डे, युवा जिल्हाध्यक्ष आर्यन पगारे, शहराध्यक्ष वैभव कढरे दिंडोरी तालुकाध्यक्ष शुभम पगारे जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष जयश्री वाघ, रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते



## खापरखेडा औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्राला एक्सलन्स वॉर्ड प्रदान

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (प्रतिनिधी) महाराष्ट्राच्या वीजनिर्मिती क्षेत्रातील कार्याला छत्तीसगड राज्यातील रायपूर येथे झालेल्या विशेष कार्यक्रमात गौरविण्यात आले. यावेळी

खापरखेडा औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्राला राज्य जनरेटिंग युटीलीटी श्रेणीमध्ये उत्कृष्ट कार्याबद्दल एक्सलन्स वॉर्ड प्रदान करण्यात आला.

महाजेनकोचे संचालक (ऑपरेशन्स) अभय हरणे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. ते म्हणाले, हा बहुमान म्हणजे खापरखेडा औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील सर्व चमूच्या वचनबद्धतेचे, समर्पित प्रयत्नांचे यश आहे. महाजेनकोच्या अथक वीजनिर्मितीला अधिक बळकटी मिळेल. यापुढे अधिक कार्यक्षमतेने काम करतांना विश्वासाहर्ता, उत्कृष्टता यासाठी सतत परिश्रम घेण्याची प्रेरणा मिळेल. आगामी काळात राज्याच्या ऊर्जा सुरक्षेमध्ये लक्षणीय भर पडणार आहे.

या समारंभाला ऊर्जा मंत्रालयाचे सचिव पंकज अग्रवाल, संयुक्त सचिव पियुष सिंह, छत्तीसगड शासनाच्या ऊर्जा विभागाचे सचिव डॉ. रोहित यादव, एटिपीसीचे व्यवस्थापकीय संचालक गुरदिप सिंग, संचालक जे.के. श्रीनिवासन तसेच महाजेनकोचे वरिष्ठ अधिकारी उप-स्थित होते. त्यात कार्यकारी संचालक राजेश पाटील, मुख्य अभियंता पंकज नागदेवते, विराज चौधरी, अतुल सोनजे यांचा समावेश होता.






# सृष्टीचे पालनहार देवाधि देव महादेव

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व हिंदू धर्माचे तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे.परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच शिव-पार्वती आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार -पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदु मान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते.भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते.त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे. आज स्थल,जल,वायु, आकाश-पातळ, पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते.आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे. आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल.महाशिवरात्रीहा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे.त्यामुळेमहाशिवरात्रीहा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे.त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था आहे.त्याच प्रमाणे ॐ नमो: शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते,शांती मिळते, आरोग्याच्या दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर



होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना हर हर महादेवचा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा हर हर महादेव चा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विघ्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन महाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती उष्णता,अती थंडी,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे. अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय, भुकंप, अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानच्या सान्निध्यातील काणा-कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळेमहाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल.त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल.

हर हर महादेव!



**रमेश लांजेवार (प्रदेश प्रवक्ता)**
**(महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना)**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# व्हेलेंटाईन डे च्या निमित्ताने पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे; भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाहीला घातक ठरू शकते

**दै. आवाज वृत्तसेवा...**

भारतात अनेक धर्म, पंथ, भाषा, जाती व धर्माप्रमाणे संस्कृती आहे.तरीही भारतीय युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करतांना दिसतात ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.आजच्या सोशल मीडियाच्या युगात युवा पिढीमध्ये भारतीय संस्कृतीचा दिवसेंदिवस विसर पडत असल्याचे मोठ्या प्रमाणात दिसून येते.१४फेब्रुवारी म्हटले की युगलांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येते.परंतु यात ते भारतीय संस्कृतीचे भान विसरतांना दीसतात. जगात संपूर्ण देश आप-आपल्या संस्कृतीची जोपासना करतात.परंतु बदलत्या काळात सध्या भारतीय युवा वर्ग पाश्चिमात्य देशांमधील संस्कृतीकडे वळतांना दीसतात.ही अत्यंत गंभीर आणि चिंतेची बाब आहे.भारत आपल्या संस्कृतीच्या बळावर अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करीत आहे व जगात तिसरी महाशक्तीच्या रूपात उभरत असतांना पाश्चिमात्य संस्कृतीचा अवलंब करणे भारतासारख्या सुसंस्कृत लोकशाही देशाला घातक ठरू शकते.१४ फेब्रुवारीला व्हेलेंटाईन डे संपूर्ण जगासह भारतीय युगल मोठ्या थाटामाटात साजरा करतात.परंतु हा दीवस संपूर्णपणे भारतीय संस्कृतीच्या विरोधात असल्याचे मी समजतो.व्हेलेंटाईन डे साजरा करायला हरकत नाही.परंतु आपली संस्कृती जोपासलीच पाहिजे व कोणतेही कार्य संस्कृतीलाच धरून असावे.कारण भारतीय संस्कृती ही संपूर्ण जगात आगळीवेगळी आहे. तीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी आजच्या युवा पिढीने घेतली पाहिजे.भारतात अनेक जाती-धर्माचे लोक रहातात. त्याचप्रमाणे या पावनभुमित अनेक भाषा, अनेक पंथ, अनेक जाती, अनेक धर्म, अनेक वेशभूषा व आगळीवेगळी संस्कृती आपल्याला पहायला मिळते. आपण देशातील कोणत्याही कानाकोपऱ्यातून किंवा टोकावरून निघालो तर प्रत्येक ४० किलोमीटर अंतरा नंतर आपल्याला वेगवेगळ्या भाषेचा गोडवा पहायला मिळतो.अशा परीस्थितीत संस्कृतीची जोपासना आजच्या युगातील युगलांनी करायला पाहिजे.आज जगातील अनेक देश भारतीय संस्कृती अवगत करण्याच्या मार्गावर आहेत.याचे उदाहरण कुंभमेळ्यात किंवा भारतीय सणांमध्ये दिसून येते.भारतीय संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी अनेक देशांतील नागरिक भारत भ्रमन करतांना दिसतात.भारतात ३६५ दिवसातील प्रत्येक दिवसाला प्रत्येक धर्मामध्ये आगळे-वेगळे महत्व असते हे आपणा सर्वांनाच माहित आहे.योगाची सुरूवात भारतातुनच झाली आणि योगाला संपूर्ण जगाने स्वीकारले जगातील मुस्लिम राष्ट्र असो किंवा कोणतेही राष्ट्र असो योगाला जास्त महत्व देतात हीच जडणघडण भारतीय संस्कृतीमध्ये आहे याची जाण युवकांनी ठेवली पाहिजे.त्याचप्रमाणे आयुर्वेद शास्त्र भारतातुन विकसित झाले व हजारो पध्दतीची औषधी युक्त वृक्ष भारतात पहायला मिळते.परंतु आपली युवा पिढी पाश्चिमात्य संस्कृतीकडे वळतांना दीसते हे भारतीय देवभुमिचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.जगाच्या पाठीवर भारत असा एकमेव देश आहे की ज्या ठिकाणी सर्वच धर्मांचे लोक आनंदाने रहातात.सोबतच भारत हा ऋशी-मुनिंचा, सुफी-साधु-संत, महाज्ञानी, क्रांतीकारक, स्वतंत्रता सेनानी,थोरपुरूषांच्या अथक प्रयत्नाने सुसंस्कृत भारत देश मोठ्या डौलाने उभा आहे. याभुमित भगवान राम, भगवान गौतम बुद्ध, महंमद पैगंबर, गुरू गोविंदसिंग इत्यादीसह अनेक देवी-देवतांचे वास्तव्य या भारत भुमीत आपल्याला पहायला मिळते.त्यांच्याच पुण्यायीने भारतीय संस्कृती विकसित झाली आहे.भारतावर सर्वच धर्माच्या देवी-देवतांचा आशिर्वाद आहे.त्याचप्रमाणे हिंदू, मुस्लिम,शिख,ईसाई, बौद्ध, जैन इत्यादी धर्माचा मोठा पगडा भारतीय संस्कृतीवर आहे.त्यामुळेच आज भारतात एकोप्याचे व खेळीमेळीचे वातावरण दिसून येते.ऐवढी अफाट आणि शक्तीशाली भारतीय संस्कृती असतांना भारतीय युगलांनी व युवकांनी पाश्चिमात्य संस्कृतीचा किंवा पध्दतीचा अवलंब का करावा?व्हेलेंटाईन डे च्या माध्यमातून भारतीय संस्कृती धोक्यात येवु शकते याला नाकारता येत नाही.याचा विचार युवा पिढीतील युगलांनी करावा. व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती नुसारच साजरा करावा.कारण कोणत्या ना कोणत्या मार्गाने पाश्चिमात्य पध्दती भारतात घर करण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते.याला रोखण्याची नितांत गरज आहे. अन्यथा भारतीय संस्कृतीचे वाटोळे झाल्याशिवाय राहणार नाही. हीबाब आजच्या नवीन पिढीने लक्षात ठेवली पाहिजे.पाश्चिमात्य संस्कृतीचा अभ्यास अवश्य करावा.परंतु त्याचा अवलंब करू नका ही माझी आग्रहाची व कळकळीची विनंती आहे.अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा भारत दौऱ्यावर असताना त्यांनी भारतीय संस्कृतीची प्रषंशा केली होती.परंतु अमेरिकेत गेल्यावर ६ फेब्रुवारी २०१५ ला भारतीय संस्कृतीवर ताशेरे ओढताना ते म्हणतात की गेल्या काही वर्षांपासून भारतात असहिष्णुता वाढली आहे.याचाच अर्थ असा की बोलतांना सांगायचे की तुमची संस्कृती चांगली आहे आणि मायदेशी गेल्यावर दुसऱ्याच्या संस्कृतीला असहिष्णुता म्हणायचे व आपल्या पाश्चिमात्य पध्दतीचा प्रचार करायचा हा कुठला न्याय? मुख्य कारण म्हणजे त्यांना भारतात सर्व धर्मांचे,जातीचे, पंथाचे लोक एकोप्याने रहातात ही बाब रूतली असावी.त्यामुळे मित्रांनो पुन्हा सांगतो की भारतीय संस्कृतीलाच स्वीकारावे व पाश्चिमात्य पध्दतीला टाटा- बाय- बाय करावे.कारण जगाच्या पाठीवर भारतीय संस्कृती अनभिज्ञआहे.भारतात रामायण, गीता, कुराण, बायबल, ग्रंथ या पाच भुजांनी बनलेला भारत व भारतीय संस्कृती आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीची जोपासना करणे हे प्रत्येक भारतीयांचे प्रथम कर्तव्य आहे.मी पुन्हा एकदा सांगु ईच्छीतो की व्हेलेंटाईन डे या दीवसाला भारतीय संस्कृतीला कुठेही तडा जाणार नाही याची काळजी युगलांनी घ्यावी.भारतीय संस्कृती इतकी अबाध्य आहे की अनेक वृक्ष, फुले व फळे संस्कृतीला धरून आहे.त्यामुळे जगाच्या दृष्टीकोनातून भारतीय निसर्ग सृष्टी आगळीवेगळी दीसुन येते.आज भारत आपल्या दुश्मन देशालासुध्दा मदत करीत आहे यामागचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती होय.आठवड्याचे ७ दीवस असतात.परंतु भारतीय संस्कृतीत प्रत्येक धर्मासाठी सातही दिवसाला वेगवेगळे महत्त्व दीसुन येते.सुर्य,चंद्र,तारे संपूर्ण जग पहाते परंतु भारतात यांची वेगवेगळ्या पध्दतीने जोपासना करून प्रत्येक धर्माच्या माध्यमातून पुजा-अर्चना केली जाते.भारतीय संस्कृतीला देवी-देवतांनी भरपूर काही दिले जे जगात तुम्हाला कुठेही पहायला मिळनार नाही.आज भारतात हिवाळा, उन्हाळा आणि पावसाळा पहायला मिळतो यातुनच सप्तरंगी धनुष्य तयार होतो.वर्षाचे १२ महीने असतात त्यात आपल्याला आगळ-वेगळ रूप,रंग पहायला मिळते.त्यामुळे भारतीय संस्कृतीची बरोबरी कोणताही देश करू शकत नाही आणि करणार नाही. करिता भारतीय संस्कृतीची जोपासना केलीच पाहिजे व पाश्चिमात्य संस्कृतीचा त्याग केला पाहिजे असे मला वाटते.कारण भारतीय संस्कृती ही जगातील अजुब्यातील एक अजुबा आहे.आपण व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृती प्रमाणेच साजरा करावा.व्हेलेंटाईन डे च्या निमित्ताने आई-वडिल, बहिण-भाऊ यांचा आदरतिथ्याने सन्मान करून त्यांचा आशीर्वाद घ्यावा यातच आपली संस्कृती आहे.यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात नवीन ऊर्जा निर्माण होवून नवचैतन्य दिसून येईल. या दिवसाला बदलते हवामान व वाढते प्रदुषण पहाता युगलांनी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प करावा.त्याचप्रमाणे युगलांनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की,१४ फेब्रुवारी २०१९ ला पुलवामा येथे भारतीय सैन्यावर आतंकवाद्यांनी आत्मघाती हल्ला केला होता यात ४० सैनिकांचा मृत्यू झाला हा दिवस भारतासाठी अत्यंत दु:खद दिवस ठरला.त्यामुळे व्हेलेंटाईन डे साजरा करतांना भारतीय संस्कृतीच्या माध्यमातून शहिदांना सुध्दा श्रद्धांजली वाहने गरजेचे आहे. शहिदांना कोटी कोटी प्रणाम.

**जय हिंद! जय भारत.**

**– रमेश कृष्णराव लांजेवार, (स्वतंत्र पत्रकार )**

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, भगवान नामदेव सोनवणे यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव बस स्टँड समोर, मालेगांव येथे छापून ढासे मळा, सावता नगर, नांदगांव ता.नांदगांव, जि.नाशिक येथे प्रकाशित केले. सहसंपादक भाऊसाहेब हुजबंद. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या, लेख, जाहिराती यामधून व्यक्त झालेल्या मतांशी मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक, सहसंपादक सहमत असतीलच असे नाही. मुद्रण दोष संभवनीय. (नांदगांव न्यायकक्षेत) सर्व अधिकार सुरक्षित. मो. ९५४५९१०१७७ – ९२७२४५३९२१ email : nandgaonawaz@gmail.com

# सीबीआय चौकशीची मागणी; अजितदादा पवार विमान अपघात प्रकरणावर संशयाचे सावट

दै. आवाज वृत्तसेवा...

तुषार रौंदळ सटाणा प्रतिनिधी :माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या बारामतीजवळ झालेल्या विमान अपघातासंदर्भात गंभीर संशय व्यक्त करत हा अपघात केवळ तांत्रिक चूक नसून त्यामागे घातपात असण्याची दाट शक्यता असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या संपूर्ण प्रकरणाची सीबीआय (उइख) मार्फत तसेच व्हीएसआर या विमान कंपनीची क्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो (--खइ) सोबतच इतर आंतरराष्ट्रीय संस्थांकडून उच्चस्तरीय चौकशी करावी, अशी मागणी माजी आमदार संजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली बागलाण तालुका राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे.



यासंदर्भात आज तहसीलदार कैलास चावडे यांना निवेदन देण्यात आले. माजी आमदार संजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयात जाऊन निवेदन सादर केले. यावेळी बोलताना माजी आमदार संजय चव्हाण म्हणाले की, २८ जानेवारी रोजी झालेल्या या अपघाताने संपूर्ण महाराष्ट्र हादरून गेला असून, अपघाताला काही दिवस उलटूनही अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरित आहेत. त्यामुळे जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम आणि संशय निर्माण झाला आहे. आमदार रोहित पवार यांनी पत्रकार परिषदांमधून तसेच आमदार अमोल मिटकरी यांनी सोशल मीडियावर मांडलेले मुद्दे पाहता हा अपघात केवळ तांत्रिक स्वरूपाचा नसून त्यामागे घातपाताची दाट शक्यता नाकारता येत नाही. श्री. चव्हाण यांनी नमूद केले की, ऐनवेळी दादांचा दौरा बदलणे, विमानाची वेळ बदलणे तसेच पायलट बदलण्यात येणे, हे सर्व संशयास्पद आहे. तीन वेळा निलंबित करण्यात आलेल्या पायलटला व्हीव्हीआयपी उड्डाणाची जबाबदारी देण्यात येणे, रनवे २९ उपलब्ध असतानाही 'टेबल टॉप' असलेल्या रनवे ११ वर उतरण्याचा आग्रह धरणे, आवश्यकतेपेक्षा कमी दृश्यमानता असतानाही लँडिंगचा निर्णय घेणे, फ्लाइट रडारचा डेटा अचानक बंद होणे, तसेच अपघातापूर्वी मुख्य पायलटने पूर्ण मौन बाळगणे, या सर्व बाबी गंभीर स्वरूपाच्या आहेत.

याशिवाय व्हीएसआर या विमान कंपनीच्या पायलटसचा तब्बल ५० कोटी रुपयांचा विमा उतरविण्यात आलेला असणे, कंपनीच्या मागील अपघातांनंतरही ठोस कारवाई न होणे, तसेच अपघातानंतर फॉरेन्सिक तपास वेळेवर न होणे, या बाबी संशय अधिक गडद करणाऱ्या असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता केवळ स्थानिक तपास यंत्रणांवर न राहता सीबीआयमार्फत उच्चस्तरीय व पारदर्शक चौकशी व्हावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

यावेळी बोलताना तालुकाध्यक्ष केशव मांडवडे यांनी सांगितले की, अजितदादा पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत महत्त्वाचे नेतृत्व होते. त्यांच्या निधनाबाबत राज्यातील जनतेच्या मनात शंका असतील तर त्या दूर करणे हे शासनाचे नैतिक कर्तव्य आहे. सत्य बाहेर येण्यासाठी निष्पक्ष आणि त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी होणे आवश्यक असून, सीबीआय व आंतरराष्ट्रीय संस्थांच्या तपासामुळेच जनतेचा विश्वास प्रस्थापित होऊ शकतो.

यावेळी तालुकाध्यक्ष केशव मांडवडे, महिला तालुकाध्यक्ष उषाताई भामरे, शहराध्यक्ष भारत काटके, मनोज छोटू सोनवणे, चेतन वनीस, रत्नाकर सोनवणे, संजय पवार, विलास सोनवणे, पोपटराव सोनवणे, किरण सोनवणे, दिलीप सोनवणे, रोशन जाधव, गौरव सोनवणे, यश सोनवणे, मिलिंद शेवाळे, भाऊसाहेब चव्हाण, साहेबराव सोनवणे, यशवंत कात्रे, प्रज्वल भामरे, माधव सोनवणे, दादा सोनवणे, मयूर अहिरे, केदार सोनवणे, राजेंद्र सोनवणे व जनार्दन सोनवणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पोलीस भरतीत ३०% महिला आरक्षण प्रमाणपत्रावर गोंधळ; उमेदवारांमध्ये संभ्रम

दै. आवाज वृत्तसेवा...

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी राज्यात ११ फेब्रुवारीपासून सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान कागदपत्र पडताळणीवेळी ३० टक्के महिला आरक्षण प्रमाणपत्राबाबत संभ्रम निर्माण झाल्याने महिला उमेदवारांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णय क्रमांक महिआ/२०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दिनांक ४ मे २०२३ नुसार, खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव पदांच्या निवडीकरिता खुल्या तसेच मागास प्रवर्गातील महिलांकडून ३०% महिला आरक्षणाचे नॉन-क्रीमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करण्यात आली आहे.

मात्र सध्या सुरू असलेल्या पोलीस भरती प्रक्रियेत काही जिल्ह्यांमध्ये महिला उमेदवारांकडून ३०% महिला आरक्षण प्रमाणपत्र सक्तीने मागितले जात असल्याची तक्रार पुढे आली आहे. शासन निर्णयानुसार तहसीलदारांना सध्या असे प्रमाणपत्र देता येत नसल्याने उमेदवार महिलांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. प्रमाणपत्र नसल्यामुळे काही महिला उमेदवारांचे अर्ज 'ओपन' प्रवर्गात विचारात घेतले जात असल्याचेही समोर आले आहे. त्यामुळे संबंधित उमेदवारांना आरक्षणाचा लाभ न मिळण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

महिला व बालकल्याण विभागाने ४ मे २०२३ रोजीच्या मंत्रिमंडळ निर्णयानुसार तहसीलदारांना ३०% महिला आरक्षण प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नसताना, पोलीस भरती प्रक्रियेत हे प्रमाणपत्र मागितले जात असल्याने महिलांमध्ये संभ्रम आणि नाराजी आहे.

या पार्श्वभूमीवर गृह विभागाने तात्काळ हस्तक्षेप करून राज्यातील सर्व जिल्हा मुख्यालयांना स्पष्ट सूचना द्याव्यात आणि महिला उमेदवारांना दिलासा द्यावा, अशी मागणी महिला उमेदवारांकडून होत आहे.

# क्रीडा स्पर्धा, कलागुण, गुणगौरवाने विद्यार्थ्यांना मिळाला मंच



दै. आवाज वृत्तसेवा...

दिपक ढोकळे, पिंपळगाव लेप : प्रतिनिधी - विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना सर्जनशीलतेची जोड मिळाली की तरुणाईचा उत्साह रंगमंचावर खुलून दिसतो.याच उत्साहाचे दर्शन घडले ते एकलहरे येथील मातोश्री फार्मसी महाविद्यालय येथे आयोजित 'युगांतर फेस्टिवल' गॅदरिंगमध्ये.विद्यार्थ्यांच्या नृत्य, गायन, सांस्कृतिक आणि बौद्धिक स्पर्धांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना मिळाला मंच मिळाला.विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबरच त्यांच्या वक्तृत्व व कलागुणांना वाव मिळावा यासाठी प्राचार्य डॉ. प्रशांत मालपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.याची थीम युगांतर फेस्ट अशी होती.

औषधनिर्मिती शिक्षण घेत असतानाही विद्यार्थ्यांनी कला, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास यांचा उत्कृष्ट संगम दाखवला.तीन दिवस स्पोर्ट डे मध्ये कॅरम,क्रिकेट, हॉलीबॉल,थ्रो बॉल, चेस,बॅडमिंटन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.त्यानंतर ग्रुप डे, साडी डे,मिस मॅच डे, ट्विंस डे, आर्ट अँड क्राफ्ट, मेहंदी अँड रांगोळी स्पर्धा, फन फेअर, कॅरेक्टर डे अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन केले.या सर्व कार्यक्रमांमधून प्रथम व द्वितीय येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पारितोषिक देण्यात आले.सांस्कृतिक कार्यक्रमात ग्रुप डान्स, सोलो डान्स, काव्य अशा विविध कलातून मधून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे प्रदर्शन केले.

कार्यक्रमाला मातोश्री आसाराबाई दराडे इंग्लिश माध्यम स्कूलच्या प्राचार्य धनश्री सोनवणे तसेच मातोश्री शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. वैशाली सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती होती. नृत्यात आदिती बऱ्हाटे प्रथमव रुपेश मेथे यांना द्वितीय क्रमांक तर तन्वी जाधव यांना उत्कृष्ट सूत्रसंचालन सन्मान देण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मालपुरे यांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच आपल्या विविध कलागुणांना वाव द्यावा,यामाध्यमातून आयुष्यात उत्तुंग यश मिळवावे असे प्रतिपादन केले.सूत्रसंचालन आदिती बऱ्हाटे, तन्वी जाधव,ओंकार लबडे व आकाश टिले यांनी केले.सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन स्वाती दराडे व अक्षता बैरागी यांनी केले.संस्थेचे अध्यक्ष,आमदार किशोर दराडे,सचिव कुणाल दराडे व मातोश्री अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .गजानन खराटे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

# लीनेस क्लब नाशिकरोडच्या अध्यक्षपदी वैशाली राठोड यांची निवड

दै. आवाज वृत्तसेवा...

नाशिकरोड: ऑल इंडिया लीनेस क्लब अंतर्गत असलेल्या 'लीनेस क्लब नाशिकरोड'चा पदग्रहण सोहळा नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या सोहळ्यात नूतन अध्यक्ष म्हणून वैशाली राठोड यांनी आपला पदभार स्वीकारला. प्रांत अध्यक्ष अंजली विसपुते यांच्या हस्ते वैशाली राठोड यांचा विशेष सत्कार करण्यात आला आणि त्यांना पदाची अधिकृत शपथ देण्यात आली. यावेळी बोलताना अंजली विसपुते यांनी महिलांच्या कर्तृत्वाचे कौतुक केले. त्या म्हणाल्या की, तारे हे स्वयंप्रकाशित असतात, त्याचप्रमाणे महिलांनी आपली गुणवत्ता सिद्ध करून समाजात स्वतःचे अढळ स्थान निर्माण केले पाहिजे.



या नवीन कार्यकारिणीत सचिवपदी भारती सुळे, तर खजिनदारपदी शालिनी भरसाखर व माधुरी मणियार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पदग्रहण सोहळ्याला निशा निरगुडे, प्रतिभा कुंभकर्ण, मेघा पिंपळे, अंजली कुलकर्णी, स्मिता सप्रे, अंजली जोशी, भाग्यश्री हिरे, वनिता पोहणीकर, नीता नगरकर, विजया राऊत, चंद्रकला साबळे, सुरेखा निमसे, मेघा वाळुंज, ज्योती कुटे आणि डॉ. मीना पाटील यांच्यासह अनेक सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता सांस्कृतिक कार्यक्रमाने झाली, ज्यामध्ये श्यामला दीक्षित, हेमा गिरीधानी, संगीता गायकवाड, किरण भोपुलकर, पल्लवी वाघ व मनीषा पवार यांनी आकर्षक नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

# उल्लेखनीय कार्याबद्दल गांगोडे सर यांचा सत्कार

दै. आवाज वृत्तसेवा...

हेमंत पवार (वडपाडा माणी) : सामाजिक चळवळीतील एक हरहुनरी समाजसेवक, जलपरिषेदेचा प्रमुख आधारस्तंभ, आदिवासी समाजाविषयी त्यांची असलेली तळमळ, प्रपंचाचा कळस सांभाळत प्रत्येक आठवड्यात सुट्टीचा रविवारी ग्रामीण भागात जाऊन लोकांमध्ये जाऊन स्थानिक समस्या सोडवून ते काम मार्गी लागेपर्यंत पाठपुरावा करणारे, सध्या निफाड येथे वनपाल या पदावर कार्यरत असलेले, नवनाथ गांगोडे (भाऊसाहेब) यांना आज त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांच्या डिपार्टमेंट तर्फे सामाजिक वनीकरण विभाग नाशिक मध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सन २०२५/२०२६ मध्ये त्यांना सन्मानपत्र देऊन सन्मानित




करण्यात आले, त्यामुळे त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी मल्लिकार्जुन जी मुख्य वनसंरक्षक नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली, सामाजिक वनीकरण विभाग मार्फत झालेल्या रावसाहेब थोरात सभागृह गंगापूर रोड नाशिक येथे त्यांना सन्मानचिन देऊन त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला, या सोहळ्या प्रसंगी .गजेंद्र हिरे, वनसंरक्षक सा. व वृत्त नाशिक, ओंकार पवार मुख्य कार्यकारी अधिकारी नाशिक , .प्रशांत दिग्रसकर शिक्षणाधिकारी जि. प. नाशिक यांसारख्या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. ह्या कार्यक्रमाचे आयोजन श्री. गणेश रणदिवे विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण नाशिक यांनी यशस्वीरित्या पार पडला.

# पुढील वाटचालीस शुभेच्छा! विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नांदगाव :- मविप्र समाज संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला. शालेय जीवनाचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण करून आयुष्याच्या नव्या क्षितिजाकडे झेप घेणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी मार्गदर्शन व शुभेच्छा देण्यात आल्या.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योती काळे, जेष्ठ शिक्षक अशोक मार्कंड, जगन्नाथ पाटील आणि सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते.

मविप्र संस्थेचे संचालक इंजि. अमित भाऊ बोरसे-पाटील यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी व पुढील वाटचालीस शुभेच्छा संदेश दिला.

निरोप समारंभाच्या निमित्ताने बोलताना विद्यार्थी भावूक झाले होते. स्वरा जाधव व वेदिका जाधव ह्या विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून शाळेतील पहिले पाऊल, शिक्षकांचे प्रेम आणि मित्र-मैत्रिणींसोबत घालवलेले क्षण यांविषयीच्या आठवणींना त्यांच्या कवितेतून व मनोगतातून उजाळा दिला.

उपशिक्षक अण्णासाहेब दुकळे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी 'टिप्स' देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वाद दिले.

मुख्याध्यापिका ज्योती काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावी ही केवळ परीक्षा नसून आयुष्याची एक नवी सुरुवात आहे. विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या मागे न धावता एक उत्तम नागरिक बनण्यावर भर द्यावा आणि जिद्द व चिकाटीने आपले ध्येय गाठावे.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता जैन हिने केले, तर आभार प्रदर्शन किरण नरोटे हिने मानले. एकमेकांचा निरोप घेताना विद्यार्थ्यांच्या डोळ्यात पाणी असले, तरी उद्याच्या यशाचा विश्वास त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता.

# आईचे छत्र हरपलेल्या वाल्मीक वाघ यांची कृषी अधिकारी पदाला गवसणी

**दै. आवाज वृत्तसेवा....**

लक्ष्मण घुगे राजापूर प्रतिनिधी येवला तालुक्यातील राजापूर येथील शेतकरी संजय फकीरा वाघ यांचा मुलगा शेतकरी कुटुंबातील .वाल्मीक संजय वाघ यांनी एमपीएससी परीक्षेत यश संपादन करून कृषी अधिकारी( क्लास टू) पदाला गवसणी घातली असल्याने राजापूर येथे त्याचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला व थाटामाटात डिजे च्या तालावर नाचत गाजत गुलालाची उधळन फटाक्यांची आताषबाजी करत मिरवणूक काढण्यात आली. वाल्मीक संजय वाघ या विद्यार्थ्याने मेहनत ,जिद्द, चिकाटी व अभ्यास करून पहिली ते चौथी पर्यंतचे शिक्षण राजापूर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतघेतले .त्यानंतर येवला येथे होस्टेलला राहून माध्यमिक शिक्षण घेऊन पुढील शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे बीएससी ग्री करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन कृषी अधिकारी पदाला गवसणी घातली आहे कृषी अधिकारी या पदावर गावातील एकमेव अधिकारी झाला असल्याने वाल्मीक वाघ व त्यांच्या कुटुंबाचा सत्कार राजापूर येथे थाटामाटात करण्यात आला कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन लक्ष्मण घुगे केली यावेळी आर बी वाघ व,ह.भ.प भास्कर बाबा दराडे यांनी मनोगत व्यक्त केले आणि



वाल्मीक वाघ यांच्या कुटुंबाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या .यावेळी राजापूर गावचे आजी माजी सरपंच ,उपसरपंच, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते . या प्रसंगी वाल्मीक वाघ यांचा व कुटुंबीयांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. वाल्मीक वाघ यांची आई स्वर्गवासी झाली आहेत आईचे छत्र मागे नसताना या विद्यार्थ्याने मेहनत व आपल्या कुटुंबाची जाण ठेवून काहीतरी केले पाहिजेत हे मनी बाळगून यश संपादन केले. वाल्मीक याच्या यशाबदल सोशल मीडियावर शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होतआहे.. परंतु हा सोन्याचा दिवस बघणयासाठी वाल्मीकची आई या जगात नाही. वाल्मीक यांनी शेतकरी कुटुंबातील अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमधून अनेक अडथळे पार करत कशाप्रकारे यश संपादन केले.याविषयी आपल्या मनोगतातून माहिती दिली. वाल्मीक यांची आई ह्या जगात नसल्याने मनोगत व्यक्त करताना त्यांना अश्रू अनावर झाले व हे सर्व ऐकून उपस्थितांचे डोळे पाणावले. वाल्मीक यांची एक बहीण पण पोलीस आहेत आईच्या छत्र नसलेल्या बहिण भावाने समाजात एक आदर्श निर्माण करून आपल्या आई-वडिलांचे व गावाचे नाव रोशन केले आहे. इतरांनी सुद्धा या बहीण भावा पासून प्रेरणा घेऊन समाजात आदर्श निर्माण करावा अशी अपेक्षा उपस्थित सर्व मान्यवरांनी व्यक्त केली. वाल्मीकच्या यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# अजय देवगण 'शतक'साठी निवेदकाच्या भूमिकेत ! ट्रेलर प्रदर्शित

**दै. आवाज वृत्तसेवा....**

'शतक - संघ के १०० वर्ष' या चित्रपटाचा बहुप्रतीक्षित ट्रेलर नुकताच प्रदर्शित झाला असून या ट्रेलरला बॉलिवूड सुपरस्टार अजय देवगण यांच्या प्रभावी आवाजाची साथ लाभली आहे. त्यांच्या भारदस्त आवाजामुळे चित्रपटाची पहिलीच झलक अतिशय प्रभावी ठरत आहे. यावरून चित्रपटाची भव्यता, भावना आणि गंभीरता यांचा अंदाज येतो.




त्याग, चिकाटी आणि राष्ट्रप्रथम या मूल्यांवर आधारलेला हा ट्रेलर गुरुजी मा. स. गोळवलकर यांच्या संघाच्या चिरंतन विचारांवर आधारित शतकीय प्रवासाचा मागोवा घेतो. विविध दस्तऐवजीकरणावर आधारलेला हा चित्रपट इतिहासातील काही न सांगितलेल्या अध्यायांकडे एका दृष्टिकोनातून पाहाण्याचा प्रयत्न करतो. भगव्या रंगाच्या प्रभावी प्रतीकातून ही संकल्पना अधिक ठळकपणे मांडण्यात आली आहे.

चित्रपटाचा भाग असल्याबद्दल अजय देवगण म्हणाले, ''राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. एक शतक हे केवळ कालगणनेतील टप्पा नसून, ते पिढ्यान् पिढ्यांच्या बांधिलकी, त्याग आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानाचे प्रतीक आहे. या शंभर वर्षांत संघाने सेवा, एकात्मता आणि सांस्कृतिक ओळख यांविषयीच्या चर्चांना आकार देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. 'शतक' या दीर्घ प्रवासावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करतो. माझ्यासाठी या कथेला आवाज देणे हा खरोखरच सन्मान आहे. ही केवळ एका संस्थेची गोष्ट नाही, तर एका विचाराची कथा आहे, जी काळाच्या ओघात अनेक आव्हानांना सामोरे जात ठामपणे उभी राहिली. जिद्द, श्रद्धा आणि सामूहिक ध्येय यांविषयी बोलणाऱ्या या कथेला माझा आवाज देणे ही अत्यंत अर्थपूर्ण अनुभूती आहे.''

पॅनोरमा यांच्या सहयोगाने निर्मित या चित्रपटाची निर्मिती वीर कपूर यांनी केली असून, दिग्दर्शन आशिष मल्ल यांचे आहे. सह-निर्माते आशिष तिवारी आहेत. 'शतक' २० फेब्रुवारी २०२६ रोजी देशभर प्रदर्शित होणार आहे.

# सरगम म्युझिक अकॅडमीतर्फे आज २७ गायकांची मैफल

**दै. आवाज वृत्तसेवा...**

नाशिक (प्रतिनिधी) -

सरगम म्युझिक अकॅडमीच्या २७ व्या वर्धापन वर्षानिमित्त सरगम सप्ताहाचे आयोजन केलेले आहे. आज दि.१४ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या ' वो शाम कुछ अजीब थी ' या मैफलीत सरगम म्युझिक अकॅडमीचे २७ विद्यार्थी वेगवेगळी गाणी सादर करणार आहेत. विशेष म्हणजे सायंकाळी ६ वाजता ही मैफल वाद्यवृंदसह होणार आहे अशी माहिती संचालक व लोकप्रिय गायक नंदकुमार देशपांडे यांनी दिली. जुन्या आग्रा रोडवरील कालिका मंदिरासमोर कालिका प्लाझा येथे कलास्मृती या नवीन अद्ययावत स्टुडिओमध्ये होणारा हा पहिलाच कार्यक्रम पूर्णपणे विनामूल्य आहे. सर्व नाशिककर रसिकांनी या मैफलीचा लाभ घ्यावा. संयोजकांनी असे आवाहन केले आहे.

वाढदिवस शुभेच्छा, जुने/नवे वाहन खरेदी/विक्री, घर/जमीन खरेदी विक्री,
उद्घाटन सोहळा तसेच आपल्या फर्मची जाहिरात करा सवलतीच्या दरात
* संपर्क * ९५४५९ १०१७७/ ८९९९९ २१९९४

# स्वतःवर प्रेम : हीच प्रेमदिनाची खरी सुरुवात !

**दै. आवाज वृत्तसेवा ...**

आज १४ फेब्रुवारी. जगभर हा दिवस प्रेमदिन म्हणून साजरा केला जातो. फुले, भेटवस्तू, संदेश आणि खास क्षणांमधून आपण प्रेम व्यक्त करतो. पण थोडे थांबून विचार केला तर समजेल की, प्रेम म्हणजे नेमकं काय? एखाद्या व्यक्तीने आपल्यासाठी दिलेला वेळ, आपल्याला समजून घेण्याची त्याची तयारी आणि कोणत्याही अटींशिवाय केलेला स्वीकार , हेच तर प्रेमाचं खरं स्वरूप आहे. मात्र एक महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, आपण हेच प्रेम स्वतःलाही देतो का?



**ॲड. मेघना मल्लाड**
(मार्गदर्शक - समुपदेशक )

या जीवनप्रवासात अनेक नाती आपल्या सोबत चालत राहतात. आई-वडील, भावंडे, नातेवाईक, मित्र, जोडीदार, मुलं. प्रत्येक नातं आपल्याला जिव्हाळा, आधार आणि आपुलकी देतं. मात्र या साऱ्या गडबडीत, जबाबदाऱ्यांमध्ये आणि अपेक्षांच्या ओझ्यात आपण स्वतःवर प्रेम करणं विसरतो. आत्मप्रेम म्हणजे स्वार्थीपणा नव्हे. ते म्हणजे स्वतःला वेळ देणं, स्वतःच्या भावनांना समजून घेणं आणि त्यांना मान्यता देणं. दिवसातून काही क्षण स्वतःला विचारलं पाहिजे. आज मला कसं वाटतंय? आनंद आहे का ताण? शांतता आहे का अस्वस्थता? आणि त्या भावनांना दडपण्याऐवजी त्यांचं स्वीकारपूर्वक निरीक्षण करणं. स्वतःवर प्रेम करणं म्हणजे केवळ यश साजरं करणं नाही; तर अपयशातही स्वतःच्या पाठीशी उभं राहणं. मानसिक आरोग्याची जपणूक, शरीराची निगा, संतुलित आहार, पुरेशी झोप, व्यायाम, चांगलं वाचन आणि सकारात्मक सहवास हे त्याचे महत्त्वाचे भाग आहेत. गरज असेल तेव्हा नम्रपणे नाही म्हणणंही तितकंच आवश्यक आहे.

आत्मप्रेम आणि स्वार्थ यात सूक्ष्म फरक आहे. इतरांना दुखावून स्वतःचं हित साधणं हा स्वार्थ; पण आदराने स्वतःची भूमिका मांडणं हे आत्मप्रेम. आपल्या गुणांची जाणीव ठेवणं, आवडी-निवडी ओळखणं आणि अंतर्मनाशी संवाद साधणं हा एक सातत्यपूर्ण प्रवास आहे. या प्रेमदिनानिमित्त इतरांवर प्रेम करतानाच स्वतःलाही प्रेम द्या. कारण स्वतःशी असलेलं सुदृढ नातं हेच इतर सर्व नात्यांना अधिक निरोगी, अर्थपूर्ण आणि आनंदी बनवतं.

**- ॲड. मेघना मल्लाड**

